


सायं. दैनिक
# सार्व मंथन
नवी दिशा, नवी आशा
मुख्य संपादक : अनिल कोळसे, मो. ९८२२५४४०७२
इंटरनेट आवृत्ती : गुगल वर पहा
www.sarvmanthan.in

श्रीयांश इंटरप्राईजेस
गिफ्ट गॅलरी, मोबाईल रिपेरिंग व ॲक्सेसरीज, ऑनलाईन सर्व्हिसेस सर्व प्रकारचे इन्शुरन्स योग्य दरात करून मिळतील.
■ सीसी टी.व्ही. ■ इन्व्हर्टर बॅटरीची विक्री-दुरुस्ती व होम सर्व्हिस
■ सर्व प्रकारचे ऑनलाईन फॉर्म व शासकीय योजनेचे फॉर्म भरुन मिळतील.
पत्ता : सुभक्ती कॉम्प्लेक्स, कुलकर्णी हॉस्पिटलच्या मागे, शुक्लेश्वर रोड, राहुरी, जि. अहिल्यानगर
संपर्क : ८७९३०९५०५०

। अहिल्यानगर । वर्ष ५ वे । अंक २२७ वा । बुधवार, ०१ एप्रिल २०२६ । पाने ४ । किंमत ३ रुपये । RNI No. MAH/MAR/2016/72596 । sarvmanthan16@gmail.com ।

# अमोल खताळांची आमदारकी धोक्यात ?

## शिंदे गटात उडाली खळबळ!
## 'जायंट किलर'ला हायकोर्टाचा दणका
## उत्पन्न व थकबाकी लपवल्याचा दावा

**संगमनेर**
सार्व मंथन । प्रतिनिधी



**विधानसभा निवडणुकीत 'जायंट किलर' म्हणून चर्चेत आलेले आमदार अमोल खताळ सध्या न्यायालयीन प्रक्रियेत अडकले आहेत. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी त्यांच्या निवडणुकीविरोधात दाखल केलेली याचिका फेटाळण्याचा खताळ यांचा अर्ज मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने नामंजूर केला आहे. यावरून अहिल्यानगर जिल्ह्यातील राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.**

या प्रकरणाची सुनावणी पुढे सुरू राहणार असून ७ मे रोजी पुढील सुनावणी होणार आहे. माजी आमदार बाळासाहेब थोरात यांनी खताळ यांच्या निवडणुकीला आव्हान देत न्यायालयात याचिका दाखल केली होती. या याचिकेत खताळ यांनी निवडणूक प्रतिज्ञापत्रात उत्पन्नाचा स्रोत तसेच कर थकबाकीची माहिती पूर्णपणे जाहीर केली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. न्यायमूर्ती किशोर संत यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी होणार आहे.महाराष्ट्रातील अनेक निवडणूक याचिका यापूर्वी फेटाळण्यात आल्या असल्या, तरी खताळ यांच्याविरोधातील याचिका न्यायालयाने स्वीकारली आहे. थोरात यांनी सरकारी जीएसटी संकेतस्थळावरील नोंदींचा आधार घेत डिजिटल पुरावे सादर केल्यामुळे या प्रकरणाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.थोरात यांच्या याचिकेनुसार, खताळ हे 'नीलकमल' नावाच्या फर्ममध्ये भागीदार होते. या फर्मवर व्यावसायिक कराची थकबाकी असल्याचे जीएसटी नोंदींवरून दिसून येते. मात्र, खताळ यांनी आपल्या प्रतिज्ञापत्रात हा संबंध उघड केला नसल्याचा आरोप आहे.

फॉर्म २६ मध्ये खताळ यांनी सरकारी देयकांबाबत 'शून्य' अशी नोंद केली होती. परंतु थोरात यांच्या मते, संबंधित फर्मवर सुमारे २५ हजार रुपयांची थकबाकी असून व्याजासह ही रक्कम ५४ हजार रुपयांहून अधिक होते. त्यामुळे माहिती लपवण्यात आल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे.खताळ यांनी याचिका फेटाळण्यासाठी अर्ज करताना आपण सध्या त्या फर्मचे भागीदार नसल्याचा आणि फर्म विसर्जित झाल्याचा दावा केला. मात्र, थोरात यांनी जीएसटी संकेतस्थळावरील नोंदी सादर करून फर्म सक्रिय असल्याचे दाखवले. न्यायालयाने या टप्प्यावर खताळ यांचा बचाव ग्राह्य धरता येणार नसल्याचे स्पष्ट केले.औरंगाबाद खंडपीठाने निरीक्षण नोंदवताना लोकप्रतिनिधित्व कायद्याच्या कलम १०० (१) (इ) अंतर्गत बाबी लागू होऊ शकतात, असे नमूद केले. त्यामुळे पुढील सुनावणीमध्ये या प्रकरणाची दिशा ठरणार आहे.

संगमनेर मतदारसंघात झालेल्या विधानसभा निवडणुकीत अमोल खताळ यांनी बाळासाहेब थोरात यांचा पराभव केला होता. चार दशकांहून अधिक काळ या मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या थोरात यांना सुमारे १० हजार मतांनी पराभव स्वीकारावा लागला होता. खताळ यांना १,११,४९५ मते मिळाली, तर थोरात यांना ९९,६४३ मते मिळाली होती.

### राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीत भाजपकडुन
# अक्षय कर्डिले यांच्या नावावर शिक्कामोर्तब
## राहुरी मतदार संघातील उमेदवारीचा सस्पेन्स संपला

**राहुरी**
सार्व मंथन । विशेष प्रतिनिधी

भाजपचे दिवंगत आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या निधनानंतर रिक्त झालेल्या या मतदारसंघात सहानुभूतीची लाट, कर्डिले कुटुंबाचा स्थानिक प्रभाव आणि भाजपची मजबूत संघटनात्मक ताकद यामुळे पक्षाने युवा चेहऱ्यावर विश्वास दाखवला आहे.

अक्षय कर्डिले यांच्या उमेदवारीमुळे राहुरीतील पोटनिवडणूक आता अत्यंत प्रतिष्ठेची ठरणार आहे. दुसरीकडे माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांनीही अपक्ष किंवा अन्य पर्यायातून मैदानात उतरण्याची तयारी सुरू ठेवल्याने ही लढत अक्षय कर्डिले विरुद्ध प्राजक्त तनपुरे अशी थेट होण्याची चिन्हे असून इतरही पक्ष,संघटना निवडणुकीच्या रिंगणात उतरणार आहे.



त्यामुळे राहुरीत बिनविरोध निवडणुकीच्या चर्चांना जवळपास पूर्णविराम मिळाला असून गावोगावी राजकीय बैठका, कार्यकर्त्यांच्या गाठीभेटी आणि शक्तीप्रदर्शनाला वेग आला आहे.

भाजपच्या स्थानिक कार्यकर्त्यांमध्ये या निर्णयामुळे उत्साहाचे वातावरण आहे. दिवंगत शिवाजीराव कर्डिले यांनी राहुरी तालुक्यात उभारलेले राजकीय जाळे, ग्रामपातळीवरील संपर्क आणि विकासकामांची पार्श्वभूमी याचा फायदा अक्षय कर्डिले यांना मिळणार असल्याचे बोलले जात आहे. युवा नेतृत्व, स्वच्छ प्रतिमा आणि नव्या पिढीशी थेट संवाद साधण्याची क्षमता यामुळे पक्षाने भविष्यातील नेतृत्व म्हणूनही त्यांना पुढे आणल्याचे मानले जाते.

दरम्यान, महायुतीसाठी ही जागा प्रतिष्ठेची मानली जात असून विरोधकांकडूनही जोरदार रणनीती आखली जात आहे. तनपुरे समर्थकांनीही गावपातळीवर हालचाली सुरू केल्याने प्रचाराची रंगत दिवसेंदिवस वाढणार आहे.

### राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीसाठी
# ईव्हीएम सरमिसळ पूर्ण

**अहिल्यानगर**
सार्व मंथन । प्रतिनिधी

राहुरी विधानसभा मतदारसंघाच्या आगामी पोटनिवडणुकीसाठी वापरल्या जाणाऱ्या ईव्हीएम व व्हीव्हीपॅट मशीनची प्रथम सरमिसळ प्रक्रिया आज येथील जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडली. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या मार्गदर्शनाखाली हा टप्पा पूर्ण करण्यात आला.

प्रथमस्तरीय तपासणी पूर्ण झालेल्या मशीनचे प्रत्यक्ष वाटप करण्यासाठी ही सरमिसळ केली जाते. भारत निवडणूक आयोगाच्या प्रणालीद्वारे विविध राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींसमोर ही प्रक्रिया पारदर्शकपणे राबविण्यात आली. यानंतर राहुरी मतदारसंघासाठी निश्चित केलेल्या मशीनच्या याद्या जिल्हा मुख्यालयात सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांना दिल्या जातील.

निवडणुकीच्या कामकाजासाठी या मशीन राहुरी मतदारसंघाचे निवडणूक अधिकारी व सहाय्यक निवडणूक अधिकारी यांच्याकडे सुपूर्द केल्या जातील. राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत या सर्व मशीन राहुरी येथील स्ट्राँग रूममध्ये सुरक्षित ठेवण्यात येणार आहेत. निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांची यादी अंतिम झाल्यानंतर सर्व संबंधित उमेदवारांनाही या सरमिसळ झालेल्या मशीनची यादी दिली जाईल.

# चांदेगावात तरुणाची गळफास घेत आत्महत्या
## अकस्मात मृत्यूची नोंद



**राहुरी**
सार्व मंथन । प्रतिनिधी

राहुरी तालुक्यातील चांदेगाव येथे ३४ वर्षीय तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना आज बुधवारी सकाळी उघडकीस आली. या घटनेमुळे गावात हळहळ व्यक्त होत आहे.

चांदेगाव येथील धनंजय सखाहरी भांड यांनी त्यांच्या राहत्या घराच्या पडवीत मृत अवस्थेत आढळून आल्याची माहिती मिळताच गावातील पोलीस पाटील संतोष खर्डे यांच्यासह बाबासाहेब भांड, शरद भांड, बाबू भांड, मयूर कोठुळे आणि संदीप भांड यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. याबाबतची माहिती मिळाल्यानंतर राहुरी पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पंचनामा करून पुढील कार्यवाही सुरू केली आहे. त्यानंतर मृतदेह रवी देवगिरे यांच्या रुग्णवाहिकेतून राहुरी ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदनासाठीपाठविण्यात आला.

या घटनेमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून राहुरी पोलीस अधिक तपास करत आहेत.

# मध्य महाराष्ट्राला अवकाळीचा इशारा
## सतर्क राहण्याचे आवाहन

**मुंबई**
सार्व मंथन । वृत्तसेवा

भारतीय हवामान विभागाच्या ३० मार्च २०२६ रोजीच्या पाच दिवसीय अंदाजानुसार मध्य महाराष्ट्रासह राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये वीज चमकणे, गारपीट आणि वादळी पावसाचा इशारा देण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

हवामान विभागाने दिलेल्या सूचनांनुसार, विजेचा कडकडाट ऐकू आल्यास तात्काळ घरात किंवा सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा. झाडाखाली, शेतात, पाण्याजवळ किंवा लोखंडी वस्तूंच्या जवळ उभे राहणे टाळावे. मोकळ्या जागेत मोबाईल फोनचा वापर करू नये. तसेच निवाऱ्यापासून दूर असल्यास जमिनीवर न पडता पाय एकत्र करून बसून राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

ग्रामपंचायत, पोलीस आणि आरोग्य विभागामार्फत तातडीने जनजागृती करण्याच्या सूचना प्रशासनाने दिल्या आहेत. रुग्णवाहिका व अग्निशमन दल सतर्क ठेवण्यात यावेत, तसेच शाळा, सभागृहे व सार्वजनिक इमारती सुरक्षित आश्रयस्थळ म्हणून खुले ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

### राहुरीत 'गडाख पॅटर्न'ची चर्चा;
# तनपुरे अपक्ष रिंगणात उतरणार?
## बहुकोनी लढतीचे संकेत!

**राहुरी**
सार्व मंथन । विशेष प्रतिनिधी

राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तालुक्यातील राजकीय समीकरणे वेगाने बदलताना दिसत असून, माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. तनपुरे हे अपक्ष उमेदवार म्हणून निवडणूक लढवण्याच्या तयारीत असल्याच्या चर्चांना सध्या जोर आला आहे.

राजकीय वर्तुळात 'गडाख पॅटर्न'ची चर्चा रंगू लागली आहे. शेजारील मतदारसंघातील शंकरराव गडाख यांनी अपक्ष म्हणून विजय मिळवत नंतर सत्तेत स्थान मिळवले होते. त्याच धर्तीवर तनपुरेही स्वतंत्रपणे निवडणूक लढवून राजकीय समीकरणे आपल्या बाजूने वळवण्याचा डाव आखत असल्याची चर्चा आहे.



दरम्यान, तनपुरे यांना विधान परिषदेत संधी मिळण्याची शक्यता वर्तवली जात होती. मात्र, निवडणूक न लढवल्यास कार्यकर्त्यांमध्ये नाराजी निर्माण होण्याची भीती लक्षात घेता ते प्रत्यक्ष मैदानात उतरण्याच्या तयारीत असल्याचे बोलले जात आहे.

विशेष म्हणजे, ते पक्षाच्या 'तुतारी' चिन्हाऐवजी 'छत्री' या अपक्ष चिन्हावर निवडणूक लढवण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

या घडामोडींमुळे राहुरीची निवडणूक बिनविरोध होण्याची शक्यता जवळपास संपुष्टात आली असून, बहुकोनी लढतीचे स्पष्ट संकेत मिळत आहेत. तनपुरे अपक्ष रिंगणात उतरल्यास भाजपाकडून अक्षय कर्डिले यांची उमेदवारी निश्चित झालेली आहे.

तसेच शिवसेनेकडून राजू शेटे हेही मैदानात उतरण्याच्या तयारीत आहेत.

याशिवाय वंचित बहुजन आघाडीकडून संतोष चोळके यांचे नाव चर्चेत असून, काँग्रेस पक्षाची भूमिका अद्याप स्पष्ट झालेली नाही. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) कोणाला उमेदवारी देते, याकडेही राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

उमेदवारी अर्ज भरण्यासाठी अवघे काही दिवस शिल्लक असताना राजकीय हालचालींना वेग आला आहे. तनपुरे यांच्या अपक्ष लढतीच्या शक्यतेमुळे राहुरीतील राजकारण अधिकच रंगतदार बनले असून, अंतिम निर्णय आणि त्याचा परिणाम काय होणार, याची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.





## संपादकीय...

मो. ९८२२५४४०७२

# अवकाळी तडाखा

राज्यात पुन्हा एकदा अवकाळी पावसाने थैमान घातले असून अनेक ठिकाणी गारपीट व मुसळधार पावसामुळे शेतीचे मोठे नुकसान झाले आहे. आधीच विविध संकटांशी झुंज देणाऱ्या शेतकऱ्यांसाठी हे आणखी एक गंभीर आव्हान ठरले आहे. गहू, कांदा, द्राक्ष, आंबा, मका यांसारख्या प्रमुख पिकांना मोठा फटका बसल्याने ग्रामीण अर्थव्यवस्थेवरही याचा विपरीत परिणाम होणार आहे. अवकाळी पावसाचे प्रमाण गेल्या काही वर्षांत वाढताना दिसत आहे. हवामानातील बदल आणि अनिश्चितता यामुळे पारंपरिक शेती पद्धतींवर परिणाम होत असून शेतकऱ्यांचे नियोजन कोलमडत आहे. काढणीच्या टप्प्यावर असलेला गहू पावसामुळे भिजून निकृष्ट होत आहे, तर कांद्याची साठवण बिघडून मोठे नुकसान होत आहे. द्राक्षबागांमध्ये गारपिटीमुळे फळे तुटून पडली आहेत, तर आंब्याच्या बागांनाही मोठा फटका बसला आहे. मक्याचे पीकही या संकटातून सुटलेले नाही.या पार्श्वभूमीवर शासनाने तातडीने मदत जाहीर करणे गरजेचे आहे. नुकसानीचे पंचनामे त्वरीत करून शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य देणे अत्यंत आवश्यक आहे. तसेच पीकविमा योजना अधिक प्रभावीपणे राबवून नुकसानभरपाई वेळेत मिळेल याची खात्री करावी. अनेकदा विमा कंपन्यांकडून होणारा विलंब आणि गुंतागुंतीची प्रक्रिया शेतकऱ्यांसाठी त्रासदायक ठरते. दीर्घकालीन उपाययोजनांवरही लक्ष देणे तितकेच महत्त्वाचे आहे. हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर शाश्वत शेती पद्धती, हवामानानुसार पिकांचे नियोजन, तसेच आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर यावर भर देणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांना योग्य वेळी अचूक हवामानाचा अंदाज मिळावा यासाठी सक्षम यंत्रणा उभी करणे आवश्यक आहे.अवकाळी पाऊस हा केवळ नैसर्गिक आपत्ती नसून तो राज्याच्या कृषी व्यवस्थेतील असुरक्षिततेचेही द्योतक आहे. त्यामुळे तात्पुरत्या मदतीबरोबरच दीर्घकालीन धोरणात्मक बदलांची गरज आहे. अन्यथा शेतकऱ्यांचे नुकसान आणि त्यातून निर्माण होणारे आर्थिक संकट अधिकच गंभीर होत जाईल.शेवटी, शेतकरी हा देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे, आणि त्याचे रक्षण करणे ही शासनाची व समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. अवकाळी पावसाच्या या संकटातून शेतकऱ्यांना सावरण्यासाठी तातडीने ठोस पावले उचलली गेली पाहिजेत.

# श्रीरामपूरची शांतता भंग करण्याचा काहींचा प्रयत्न : आ. ओगले

**श्रीरामपूर**
**सार्व मंथन । प्रतिनिधी**

श्रीरामपूरचा जातीय सलोखा बिघडवून शांतता भंग करण्याचा काहींचा प्रयत्न आहे त्यांचा तातडीने बंदोबस्त करा अन्यथा रस्त्यावर उतरावे लागेल असा इशारा आ. हेमंत ओगले यांनी दिला आहे.

नुकत्याच झालेल्या राम-रहीम उत्साहामध्ये घडलेल्या प्रकाराबाबत आ. ओगले यांच्यासह नगराध्यक्ष करण ससाणे यांनी अतिरिक्त पोलीस अधीक्षक कार्यालयात जाऊन पोलीस प्रशासनाला जाब विचारला, यावेळी श्रीरामपुरातील नगरसेवक, व्यापारी, डॉक्टर, वकील यांच्यासह प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पोलीस प्रशासनाला दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, गेल्या काही दिवसांपासून श्रीरामपूर हे गुन्हेगारीचे केंद्र बनले आहे. खुल्याआम हत्या, हाणामाऱ्या, सर्रासपणे अवैध गावठी कट्टे यांसारख्या गोष्टी घडवून जाणीवपूर्वक दहशत माजवण्याचा काहींचा प्रयत्न आहे. कायदा व सुव्यवस्था राखण्याची राखण्याची जबाबदारी ज्या पोलिस प्रशासनावर आहे तेच हतबल झाल्याचे चित्र दिसत आहे. त्याचे ताजे उदाहरण देण्याचे झाल्यास सध्या चालू असलेल्या राम-रहिम उत्सव चालू आहे. त्यामध्ये सय्यद बाबा उरुस चालू असताना छत्रपती शिवाजी महाराज चौकात एका इसमावर प्राणघातक हल्ला झाला. लगेच दुसऱ्या दिवशी श्रीराम नवमीच्या झेंडा मिरवणुकीवर दगडफेक करण्यात आली. श्रीराम नवमीच्या यात्रेत काही स्वयंघोषित धर्मरक्षक म्हणवून घेणाऱ्यानी जातीयवाद करुन यात्रा बंद पाडण्याचा घाट घातला. त्याच्याच दुसऱ्या दिवशी श्रीराम मंदिर चौकात भर यात्रेत एका इसमावर प्राणघातक हल्ला करण्यात आला.

अशा प्रकारे ऐन सणासुदीच्या काळात गावात दहशत माजवून गावची शांतता भंग करण्यात आली आहे. आणि हा सगळा प्रकार पोलिस प्रशासन उघड्या डोळ्यांनी बघत आहे. काही प्रवृत्तींना गावात जाती जाती मध्ये, धर्मामध्ये द्वेष पसरवून जातीय सलोखा बिघडवून अशांतता पसरवायचे आहे.

समाजकंट हा कुठल्याही धर्माचा अथवा जातीचा नसतो अशांवर तातडीने गुन्हे दाखल करावे अन्यथा श्रीरामपूरचे नागरिक कायदेशीर रित्या प्रशासना विरोधात आंदोलन करतील असा इशारा दिला आहे.

या निवेदनावर जिल्हाध्यक्ष सचिन गुजर, माजी सभापती बाबासाहेब दिघे, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर मुरकुटे, सभापती सुधीर नवले, तालुकाध्यक्ष प्रमोद भोसले, शहराध्यक्ष अण्णासाहेब डावखर, व्यापारी असोसिएशनचे राहुल कोठारी, गटनेते मुजफ्फर शेख, दिलीप नागरे, मार्केट कमिटीचे संचालक राजेंद्र पाऊलबुद्धे, राजू चक्रनारायण, सभापती राजेंद्र पवार, दिपक वमने, योगेश जाधव, रईस जहागिरदार, पंडित मामा बोंबले, गौतम उपाध्ये, अशोक उपाध्ये, अहमदभाई जहागिरदार, मुन्ना झंवर, राहुल कोठारी, नंदू कोठारी, निलेश बोरावके, मुन्ना पठाण, नीलेश नागले, लकी सेठी, बिट्टू कक्कड, रवींद्र खिलारि, बाळासाहेब खाबीया, डॉ. सलीम शेख, संतोष परदेशी, कलीम कुरेशी, जावेद शेख, सुधीर वायखिंडे, अशोक बागुल, रितेश एडके, रमेश घुले, सरबजित चूग, रितेश चव्हाणके, जफर शहा, योगेश ओझा, प्रशांत डावखर, नवाज जहागिरदार, रावसाहेब आल्हाट, जीवन सुरुडे, मास्टर सरवरअली, सागर भागवत, युनुस पटेल, भाग्येश लोखंडे, सुरेश ठुबे, संदेश गोर्ड, सुनील साबळे , संजय गोसावी, अशोक जगधने, योगेश गायकवाड, परेश गाडेकर, सनी मंडलिक, राजेश जोंधळे, सागर दुपटी यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.



## वकील, न्यायालयीन कर्मचारी व कुटुंबियांना
# आरोग्य सुरक्षा कवचासाठी महत्त्वपूर्ण बैठक
### आयुष्मान भारत व महात्मा फुले योजनांचा संयुक्त लाभ देण्याचा पुढाकार

**अहिल्यानगर**
**सार्व मंथन । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील वकील, न्यायालयीन कर्मचारी, न्यायाधीश तसेच त्यांच्या कुटुंबीयांना आरोग्य सुरक्षा कवच मिळावे या उद्देशाने जिल्हा न्यायालयात नुकतीच एक महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. आयुष्मान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजना या योजनांचा संयुक्त लाभ सर्व पात्र घटकांपर्यंत पोहोचवण्यासाठी पीपल्स हेल्पलाईन व भारतीय जनसंसद यांच्या वतीने पुढाकार घेण्यात आला आहे.

ही बैठक प्रधान जिल्हा न्यायाधीश शिवाजीराव कचरे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी आयुष्मान भारत योजनेचे जिल्हा प्रमुख डॉ. अनिकेत भालसिंग, दक्षता अधिकारी व्ही. बी. वांडेकर, टीम लीडर हर्षवर्धन साळवे, पीपल्स हेल्पलाईनचे अध्यक्ष ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. कारभारी गवळी तसेच ॲड. अमित थोरात आदी मान्यवर उपस्थित होते.

बैठकीत एक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला असून, उत्पन्नाची कोणतीही अट न ठेवता न्यायव्यवस्थेशी संबंधित सर्व पात्र घटकांना या योजनांचा लाभ देण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले. या निर्णयामुळे जिल्ह्यातील सुमारे १० हजार कुटुंबांना मोफत व कॅशलेस वैद्यकीय उपचाराची सुविधा उपलब्ध होणार आहे.

अधिकाऱ्यांनी माहिती देताना सांगितले की, या योजनांमुळे गंभीर आजारांवरील उपचार, रुग्णालयीन खर्चासाठी आर्थिक संरक्षण तसेच व्यापक आरोग्य सुरक्षा उपलब्ध होणार आहे. त्यामुळे न्यायव्यवस्थेत कार्यरत वकील व कर्मचारी यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

यावेळी ॲड. कारभारी गवळी यांनी या उपक्रमाचे स्वागत करत, ''आरोग्य हा हक्क आता संरक्षणही'' या संकल्पनेला बळ देणारा हा निर्णय असल्याचे सांगितले. समाजातील सेवाभावी घटकांसाठी ही योजना आरोग्य सुरक्षा देणारे ऐतिहासिक पाऊल असल्याचे त्यांनी नमूद केले. न्यायव्यवस्थेतील घटकांना केवळ सेवा देण्याची जबाबदारी नसून त्यांच्या आरोग्याचीही खात्री मिळणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

तसेच प्रधान जिल्हा न्यायाधीश शिवाजीराव कचरे यांनी संबंधित लाभार्थ्यांपर्यंत योजनांची माहिती प्रभावीपणे पोहोचविण्याचे आश्वासन दिले.

# शनैश्वर देवस्थानच्या कर्मचाऱ्यांचे सलग तिसऱ्या दिवशी उपोषण सुरुच

**सोनई**
**सार्व मंथन । प्रतिनिधी**

शनिशिंगणापूर येथील श्री शनैश्वर देवस्थानच्या नवीन कर्मचाऱ्यांनी सात महिन्यांचे थकित मानधन मिळावे या प्रमुख मागणीसाठी देवस्थानच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर सलग दुसऱ्या दिवशीही उपोषण सुरु ठेवले आहे. देवस्थान प्रशासनाने मात्र याकडे दुर्लक्ष करत भेट देण्याचे टाळले आहे.



शनैश्वर देवस्थानच्या नवीन कर्मचाऱ्यांनीं सोमवार दि.३० मार्च पासून विविध मागण्यासाठी सुरु केलेले उपोषण दि. ३१ मार्च रोजी मंगळवारी पण सुरु होते.गेल्या पंधरवाड्यात देवस्थानचे प्रशासक तथा विभागीय आयुक्त डॉ.प्रवीण गेडाम यांना या नवीन कर्मचाऱ्यांनीं मागील सात महिन्याचे वेतन मिळावे या मागणीसाठी उपोषणाचे निवेदन दिले होते. गेल्या सात महिन्याचे वेतन, तसेच देवस्थानच्या आरोग्य सुविधा मिळाव्यात,तसेच शासन दरबारी कायमस्वरूपी कर्मचारी म्हणून सेवेत घेणे,दरमहा वेतन निश्चित तारखेला जमा करणे आदी मागण्यासाठी शनैश्वर देवस्थान नवीन कर्मचारी उपोषणास बसले आहेत. देवस्थान प्रशासनाच्या वतीने मात्र कोणीही या उपोषणाकडे फिरकले नाहीत. सलग दुसऱ्या दिवशी उपोषण सुरु असल्यामुळे काहींची तब्येत ढासळी. सोनई प्राथमिक आरोग्य केंद्राचे शनिशिंगणापूर समुदाय आरोग्य अधिकारी डॉ.सुनील वाघ यांनी पथकासह सर्वांची आरोग्य तपासणी केली. तसेच शनैश्वर देवस्थानच्या कर्मचारी उपोषणास आम आदमी पार्टीचे जिल्हाध्यक्ष राजू आघाव, सामाजिक कार्यकर्ता अंबादास राऊत, संदिप कुसळकर,सखाराम राशीनकर आदींनी भेटी देत वेतन संदर्भात कर्मचाऱ्यांना पाठिंबा दिला. देवस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी अतुल चोरमारे यांनी उपोषणकर्त्यांना उपोषण मागे घ्यावे याबाबत विनंती नोटिस दिली होती. पण कर्मचाऱ्यांनीं ती घेतली नसून उपोषणावर कर्मचारी ठाम आहेत.

**वेतनाचा पेच कसा सुटणार याबाबत प्रश्नचिन्ह?**

'तत्कालीन विश्वस्त मंडळाला मुंबई धर्मदाय आयुक्त अमोघ कलोती यांनी अनावश्यक कर्मचारी भरती बाबत ४१ डी नुसार नोटीस बजावली होती. यानुसार विश्वस्त मंडळाने आपले म्हणणे मांडले होते. याबाबत पुढील सुनावणी २०एप्रिल रोजी असून याचा निकाल प्रलंबित आहे. ही बाब न्याय प्रविष्ठ असल्याने देवस्थानचे प्रशासन याबाबत निर्णय घेण्यास धजावत नाही. याबाबत आम्ही शासन स्तरावर मार्गदर्शन मागु असे उत्तर प्रशासना कडून दिले जात आहे. यामुळे मोठा पेच निर्माण झाला आहे.

## जिल्हा माहिती कार्यालयातील
# शिपाई चिंतादेवी जयस्वार
## नियतवयोमानानुसार सेवानिवृत्त



### कर्मचाऱ्यांच्यावतीने स्नेहपूर्ण निरोप

**अहिल्यानगर**
**सार्व मंथन । प्रतिनिधी**

जिल्हा माहिती कार्यालय, अहिल्यानगर येथे कार्यरत शिपाई श्रीमती चिंतादेवी जयस्वार नियत वयोमानानुसार आज सेवानिवृत्त झाल्या. त्यांच्या ३५ वर्षांच्या प्रदीर्घ व समर्पित सेवेनिमित्त कार्यालयातील अधिकारी, कर्मचाऱ्यांनी त्यांना स्नेहपूर्ण निरोप देत त्यांच्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. जिल्हा माहिती अधिकारी सुरेश पाटील यांच्या हस्ते श्रीमती जयस्वार यांचा शाल, श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला.

यावेळी माहिती अधिकारी अमोल महाजन, वरिष्ठ लिपीक संतोष गुजर, लिपीक आयुष बाळदे, तुषार पाटील, कॅमेरामन धनंजय जगताप, वाहन चालक प्रविण मुठे, जिल्हा कोषागार कार्यालयातील पुष्पा देवकर, मीरा कोल्हे, संगिता निमोणकर तसेच प्रदीप जयस्वार, सरिता जयस्वार, गणेश जयस्वार, आयुष जयस्वार, अक्षदा जयस्वार आदी उपस्थित होते.

यावेळी श्री. पाटील म्हणाले, श्रीमती जयस्वार यांनी आपल्या सेवाकाळात प्रामाणिकपणा, शिस्त व कर्तव्यदक्षता यांचे उत्तम उदाहरण घालून दिले. कार्यालयातील प्रत्येक काम त्यांनी जबाबदारीने व तत्परतेने पार पाडले. कार्यालयास त्यांची उणिव निश्चित जाणवेल, त्यांचे सेवा निवृत्तीनंतरचे आयुष्य आरोग्यमय व समाधानकारक जावे, अशी सदिच्छाही त्यांनी यावेळी व्यक्त केली.

निरोप समारंभात सहकारी कर्मचाऱ्यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, श्रीमती जयस्वार यांचा स्वभाव अत्यंत मनमिळाऊ, सहकार्यशील व कष्टाळू होता. त्यांनी नेहमीच सर्वांना सहकार्य केले. त्यांच्या सेवानिवृत्तीमुळे कार्यालयात एक जिव्हाळ्याची उणीव जाणवेल, अशा भावना व्यक्त करण्यात आल्या.

यावेळी श्रीमती जयस्वार यांनीही आपल्या सेवाकाळातील अनुभव सांगताना सर्व अधिकारी व सहकाऱ्यांचे मनःपूर्वक आभार मानले. कार्यालयाकडून मिळालेल्या सहकार्यामुळेच आपण आपली जबाबदारी यशस्वीपणे पार पाडू शकलो, असे त्यांनी नमूद केले.

**राहुरीत जागा भाडोत्री देणे आहे**

नगर मनमाड रोड हॉटेल आकाश शेजारी जोगेश्वरी आखाडा जवळ पाच गुंठे चे शेड व पडवी व मोकळी जागा भाडोत्री देणे आहे.
संपर्क :- मोबाईल नंबर ९४२२०२१०२६ (११ मार्च)

**मुळव्याध, मुतखडा व भगंदर त्वचारोग आयुर्वेदिक औषधाने बरा**

मुळव्याध रक्त पडणे, कोंब, आग होणे, भगंदर, शौचास त्रास तसेच मुतखडाचे सर्व आजारावर-आयुर्वेदिक औषध मुतखडा (किडनी स्टोन) १ एमएम ते ४० एमएमचे-खडे औषधाने विरघळतात. पोट, कंबर, गुडघे दुखणे यावर आयुर्वेदिक रामबाण
औषध ऑपरेशनची गरज नाही, त्वचा रोग संबंधी सर्व औषध उपलब्ध आयुर्वेदिक बरे झालेले पेशंटचे व्हिडिओ पहायला मिळेल.
संपर्क-अशोकराव पालवे वांजुळपोई, ता. राहुरी मो. नं. ९३७०५०४७७६ (०३ डिसेंबर)

**राहुरीत गाळे भाडोत्री देणे आहे**

राहुरी मार्केट यार्ड मधील शेतकरी भवन मागे एक हॉल ४९ बाय ३४ व ११ बाय ३४ चे गाळे भाडोत्री देणे आहे. तरी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा.
संपर्क-९४०४५३९७०७, ९८८१७६०३२४ (०६ डिसेंबर)

फिक्स चान्स के लिए संपर्क करे
100% कोहिनुर Rs. 100/-
कल्याण राजधानी नाईट साप्ताहिक
साप्ताहिक Date : 30.3.26
कल्याण - राजधानी (डे/ना) मेन बाजार (ओपन) या (क्लोज) मेन बाजार
Date : 30.3.26

| | | | |
|---|---|---|---|
| 3 580 670 689 | 8 170 378 567 | 5 140 249 348 | 0 235 370 578 |
| 4 130 239 347 | 9 180 289 478 | 6 150 259 358 | 1 290 380 560 |
| 5 168 690 780 | 0 136 145 235 | 7 278 250 890 | 2 138 147 156 |
| 6 367 349 790 | 1 128 245 489 | 8 125 189 459 | 3 120 247 256 |
| 7 124 278 458 | 2 237 390 679 | 9 360 450 469 | 4 149 158 590 |
| 8 125 134 350 | 3 880 670 689 | 0 235 370 578 | 5 230 258 780 |

कायमचा मेंबरसाठी संपर्क साधा (अंकशास्त्रावर आधारित दुर उपयोग करु नये)

फिक्स चान्स के लिए संपर्क करे
100% कोहिनुर Rs. 100/-
कल्याण राजधानी नाईट साप्ताहिक
साप्ताहिक Date : 30.3.26
कल्याण राजधानी (डे/ना) मेन बाजार (ओपन) या (क्लोज) मेन मुंबई
100% Date Fix FREE GAME Open to Close


| सोमवार ते मंगळवार | बुधवार ते गुरुवार |
|---|---|
| 4 338 699 9 388 144 | 5 366 447 0 118 299 |
| 40 - 45 x 90 - 95 | 51- 56 X 01- 06 |

| शुक्रवार ते शनिवार | साप्ताहिक |
|---|---|
| 1 227 588 6 277 330 | 2 336 499 7 188 449 |
| 12 - 17 x 62 - 67 | 23 - 28 X 73 - 78 |

साप्ताहिक CP
57 X 90
78 X 10
89 X 12

विचार बदला नशीब बदलेल
संपर्क : 9970640587

## भोकर व खोकर परिसराला
# वादळी वारे व अवकाळीचा तडाखा





**श्रीरामपूर**
**सार्व मंथन । प्रतिनिधी**

तालुक्यातील भोकर व खोकर शिवारात अवकाळी पाऊस व वादळी वाऱ्याचा चांगलाच तडाखा बसला. परीसरातील मका, गहु, बाजरी व कांद्यासह डाळींब, आंबा व द्राक्ष बागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले, वादळी वाऱ्याने आठवडे बाजार उधळला तर काही घरांचे पत्रे उडाले तर जोराच्या वाऱ्याने विजेचा खांब पडल्याने काही भागात १७ तासांनतर तर काही भागात २४ तासानंतर विज पुरवठा सुरळीत करण्यात महावितरणला यश आले.

परीसरातील शेतकऱ्यांच्या नुकसानीचे पंचनामे करून सरकारने नुकसान भरपाई देण्याची मागणी शेतकऱ्यांकडून केली जात आहे. भोकर शिवारातील गट नं. ५१५ मधील मंगला प्रकाश जगताप व प्रिया राजेश चौधरी यांचे क्षेतातील पाच एकर आंब्याच्या बागेतील अनेक आंब्याच्या झाडांच्या कैऱ्यासह फांद्या तुटल्या त्याच बरोबर जोराच्या वादळाने मोठ्या प्रमाणात कैऱ्या पडल्याने या शेतकऱ्यांचे सुमारे पाच लाखाचे नुकसान झाल्याचा अंदाज आहे. त्याच बरोबर खोकर शिवारातील खोकर-अशोकनगर रोडलगत झालेल्या वादळी वाऱ्याने गट नं. १२३ मध्ये सेवानिवृत्त कृषी अधिकारी एकनाथ जाधव यांच्या आंब्याच्या बागेत मोठ्या प्रमाणात कैऱ्या पडल्याने यांचे मोठे नुकसान झाल्याचे दिसत आहे.

त्याच बरोबर सदाशिव पटारे व कैलास भणगे आदिंसह अनेक शेतकऱ्यांच्या शेतातील आंब्याच्या कैऱ्या माठ्या प्रमाणात पडल्याने मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. या परीसरातील शेतकऱ्यांच्या आंब्याच्या झाडांना एकाच महिण्यात दुसऱ्यांदा वादळाचा तडाखा बसल्याने या शेतकऱ्यांचे कंबरडे मोडल्याचे दिसत आहे.

त्याच बरोबर अनेक शेतकऱ्यांच्या उन्हाळी बाजरी व मकाला या वादळाचा चांगलाच तडाखा बसला, उभी पिकं आडवी झाल्याने सध्या या प्रत्येक शेतकरी अशा परीस्थीतीत हताश होवून या पिकांकडे पाहत आहे. तर वर्षभर पुरणारे धान्याच्या (साल चंदी) हिशोबाने पेरलेला गहु काढणीला आल्यानंतर एकाच महिण्यात दुसऱ्यांदा वादळाचा व अवकाळीचा तडाखा बसल्याने या परीसरात गव्हाचे ही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. त्याच बरोबर अनेक शेतकऱ्यांनी काढलेल्या कांद्यांना अवकाळीचा चांगलाच तडाखा बसला. या परीसरातील सतीष अशोकराव चौधरी यांच्या गट नं.२८४ मध्ये काढलेला कांदा प्लास्टीक कागदाने झाकलेला होता परंतू जोराच्या वाऱ्याने हा कागद उडाल्याने यांचा सुमारे ६० टन कांदा पावसाने भिजला तर येथून जवळच असलेल्या गोविंद बाळासाहेब चौधरी यांच्या गट नं.२७९ मधील सुमारे १५ टन काढलेला कांदा अवकाळीने भिजला. अशीच अवस्था अनेक शेतकऱ्यांची झाली आहे.

## थोडक्यात

### सोनई-खेडले रस्त्यावर बाभळीचे झाड पडल्याने वाहतूक विस्कळीत

सार्व मंथन सोनई । नेवासा तालुक्यातील सोनई खेडले परमानंद रस्त्यावर जाधव वस्ती येथे दि. ३० मार्च रोजी दुपारच्या दरम्यान वादळी वाऱ्यामुळे बाभळीचे झाड रस्त्याच्या मधोमध पडल्यामुळे हा रस्ता वाहतुकीसाठी बंद झाला होता. यामुळे काही काळ वाहतुकीची समस्या निर्माण झाली होती. सोनईसह इतर गावांना हा रस्ता जोडलेला असल्यामुळे या गावाचा सोनईशी संपर्क तुटला. अनेक गावे या रस्त्यामुळे जोडली गेली असल्याने दळणवळणाच्या दृष्टी हा रस्ता अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. मात्र ३१ मार्च रोजी दुपारपर्यंत प्रशासनाने मात्र झाडं हटवण्याकडे दुर्लक्ष केले होते.



### घोडेगाव येथे किरकोळ वादातून मारहाण; दोघांविरुद्ध गुन्हा दाखल



सार्व मंथन घोडेगाव । सोनई पोलिस स्टेशन हद्दीतील घोडेगाव येथे किरकोळ कारणावरून झालेल्या वादातून मारहाणीची घटना घडली आहे. या प्रकरणी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी मुक्ताबाई रामकिसन शिदोरे (वय ६५, रा. घोडेगाव, ता. नेवासा) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून दत्तात्रय सुधाकर शिदोरे व अलका सुधाकर शिदोरे (रा. घोडेगाव) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना दि. ३० रोजी सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास फिर्यादीच्या घरासमोरील पटांगणात घडली. फिर्यादी आपल्या घरासमोरील पटांगणात वीटा उचलत असताना आरोपी तेथे आले. त्यांनी 'ही वीट का उचलतेस' असा जाब विचारत वाद घातला. त्यावरून दोन्ही बाजूंमध्ये बाचाबाची झाली. या वादाचे रूपांतर पुढे मारहाणीत झाले. आरोपींनी फिर्यादीला लाथाबुक्क्यांनी मारहाण केली तसेच पटांगणातील वीट उचलून फिर्यादीच्या पाठीवर व कमरेवर मारल्याचे फिर्यादीत नमूद आहे. तसेच आरोपी महिलेने फिर्यादीच्या हातातील विळा काढून घेऊन तिच्या उजव्या हाताच्या मनगटावर वार करून जखमी केल्याचेही फिर्यादीत म्हटले आहे. या घटनेत फिर्यादी जखमी झाल्याने त्यांना सिव्हिल हॉस्पिटल, अहिल्यानगर येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. मारहाणीत वीट व विळा यांचा वापर झाल्याची नोंद आहे. घटनेनंतर फिर्यादीने सोनई पोलिस ठाण्यात धाव घेत फिर्याद दिली. त्यानुसार गुन्हा र. नं. १०३/२०२६ अंतर्गत भादंवि कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ आदी कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


# शिर्डी परिसरात कोट्यवधी जमीन व्यवहार फसवणूक

## कॅप्टन अशोक खरात दाम्पत्यासह पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल; दोघांना अटक

**शिर्डी**
सार्व मंथन । प्रतिनिधी

शिर्डी परिसरात कोट्यवधी रुपयांच्या जमीन व्यवहारातून फसवणूक केल्याप्रकरणी कॅप्टन अशोक खरात, त्यांच्या पत्नी कल्पना खरात यांच्यासह पाच जणांविरुद्ध शिर्डी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणात दोन आरोपींना अटक करण्यात आली असून उर्वरित आरोपींचा शोध सुरू आहे.

शिर्डी पोलीस स्टेशन येथे सीआर नं. २१३/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम ३१६ (२), ३१८ (२), ३१८ (४) तसेच महाराष्ट्र सावकारी अधिनियम २०१४ चे कलम ३९ व ४४ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



फिर्यादीने दिलेल्या माहितीनुसार, ऑगस्ट २०२३ पासून शिर्डी, नाशिक आणि राहाता परिसरात जमीन व्यवहार करत असताना कॅप्टन अशोककुमार खरात यांनी तीन कोटी रुपयांची गरज असल्याचे सांगून दरमहा दोन टक्के व्याजाने रक्कम दिली. त्यानंतर आणखी २कोटी ५२ लाख रुपये देण्यात आले. या व्यवहारातून आरोपींनी व्याजाच्या नावाखाली १ कोटी ६४लाख रुपये किरण सोनवने, अरविंद बावके आणि अशोक तांबे यांच्या मार्फत घेतल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे.

फिर्यादीने व्याजाची रक्कम परत केल्यानंतर उर्वरित रकमेचा हिशोब करून जमीन पुन्हा स्वत:च्या नावावर करण्याचा प्रयत्न केला. मात्र कॅप्टन अशोककुमार खरात, त्यांची पत्नी कल्पना खरात आणि अरविंद बावके यांनी टाळाटाळ करत व्यवहार पूर्ण केला नाही. यामध्ये चार एकर जमीन स्वत:च्या नावावर करून न देता फसवणूक केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

तसेच फिर्यादीने विश्वासाने सही केलेले चेकबुक किरण सोनवने यांच्याकडे दिले असता त्याचा गैरवापर करून खात्यातील रक्कम परस्पर वर्ग करून घेतल्याचाही आरोप करण्यात आला आहे.

या प्रकरणी कॅप्टन अशोककुमार एकनाथ खरात (रा. नाशिक), कल्पना अशोककुमार खरात (रा. नाशिक), किरण नानासाहेब सोनवने (रा. निमगाव, ता. राहाता), अरविंद पांडुरंग बावके (रा. साकुरी, ता. राहाता) आणि अशोक परभत तांबे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणात आरोपी क्रमांक तीन व चार यांना अटक करण्यात आली असून उर्वरित आरोपींचा शोध शिर्डी पोलीस घेत आहेत. जमीन व्यवहारातून झालेल्या कोट्यवधी रुपयांच्या फसवणुकीमुळे शिर्डी परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

### जिद्दीला कष्टाची झालर

## चांदेगावच्या अक्षता भांड यांना 'पीएचडी' प्रदान

**आंबी**
सार्व मंथन । प्रतिनिधी

राहुरी तालुक्यातील चांदेगाव येथील कन्या अक्षता चंद्रकांत भांड यांनी भारतीय पशुचिकित्सा अनुसंधान संस्थान, इज्जत नगर, उत्तर प्रदेश येथून पी. एच. डी अर्थात आचार्य पदवी संपादन केली आहे. ग्रामीण भागातील एका विद्यार्थिनीने जिद्दीच्या जोरावर मिळवलेल्या या यशामुळे संपूर्ण पंचक्रोशीत त्यांचे कौतुक होत आहे.



डॉ. अक्षता या केशव गोविंद विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक चंद्रकांत भांड यांच्या कन्या आहेत. विशेष म्हणजे, दोन वर्षांपूर्वीच त्यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत 'पशुधन विकास अधिकारी-वर्ग-१ पदी निवड झाली होती. प्रशासकीय सेवेत कार्यरत असतानाच त्यांनी आपले संशोधन कार्य ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. महेंद्रन यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे पूर्ण केले.

अक्षता यांचे प्राथमिक शिक्षण चांदेगावच्या जि.प.शाळेत, तर माध्यमिक शिक्षण केशव गोविंद विद्यालय, बेलापूर खुर्द व चंद्रेश्वर माध्यमिक विद्यालय, चांदेगाव येथे झाले. ग्रामीण पार्श्वभूमी असूनही, शालेय जीवनापासूनच प्रशासकीय अधिकारी होण्याचे स्वप्न उराशी बाळगून त्यांनी घेतलेल्या कठोर परिश्रमाचे फळ आज त्यांना मिळाले आहे.

त्यांच्या या यशाबद्दल माजी खा. प्रसाद तनपुरे, माजी राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अरुण तनपुरे, हर्ष तनपुरे, माजी उपसभापती गोरक्षनाथ पवार, शिवाजी शिक्षणचे उपाध्यक्ष ज्ञानेश्वर कोळसे, विवेकानंद नर्सिंग होमचे उपाध्यक्ष भारत वारुळे, प्राचार्य बाळासाहेब काळे यांच्यासह राजकीय व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे विशेष अभिनंदन केले आहे.

### सामूहिक विवाह सोहळा आयोजनासाठी

## नोंदणीकृत सेवाभावी संस्थांनी प्रस्ताव सादर करावेत

**अहिल्यानगर**
सार्व मंथन । प्रतिनिधी

कन्यादान योजनेअंतर्गत जिल्ह्यातील अनुसूचित जमातीच्या वधू-वरांसाठी सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यासाठी नामांकित नोंदणीकृत सेवाभावी संस्था व यंत्रणांनी प्रस्ताव सादर करावेत, असे आवाहन राजूर एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी देवकन्या बोकडे यांनी केले आहे.

सन २०२५-२६ या वर्षात जिल्ह्यातील अनुसूचित जमातीच्या जोडप्यांना २५ हजार रुपये, तर सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन करणाऱ्या नोंदणीकृत सेवाभावी संस्थांना प्रत्येक जोडप्यामागे २,५०० रुपये इतके अनुदान देण्यात येणार आहे.

प्रस्तावासोबत संस्थेचा नोंदणी दाखला, संस्थेच्या घटनेची प्रत, संचालक मंडळाची यादी, अध्यक्ष व सचिव यांची आधारकार्डाची प्रत जोडावी. संस्था आर्थिकदृष्ट्या सक्षम असावी. संस्थेने कोणताही आर्थिक गैरव्यवहार केला नसल्याचे अथवा संस्थेवर कोणताही गुन्हा दाखल नसल्याचे १०० रुपयांच्या स्टँप पेपरवरील प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे.

संस्थेने वर व वधूचे विवाह नोंदणी अर्ज शासन निर्णयानुसार आवश्यक कागदपत्रांसह प्रकल्प अधिकाऱ्यांकडे सादर करणे बंधनकारक राहील. प्रस्ताव व लाभार्थ्यांची कागदपत्रे अपूर्ण असल्यास संस्थेची निवड रद्द करण्यात येईल व अनुदान देण्यात येणार नाही. सहभागी जोडप्यांना विवाहाच्या दिवशी विवाह नोंदणी प्रमाणपत्र देणे बंधनकारक आहे.

संस्थेने सादर करावयाचा प्रस्ताव व त्यातील अटी-शर्ती या ३ मार्च २००४, १८ फेब्रुवारी २००९ व १५ मार्च २०२४ रोजीच्या शासन निर्णयातील परिशिष्ट अ व ब नुसार असाव्यात. मंजूर लक्षांकानुसार पात्र लाभार्थी न मिळाल्यास लक्षांक वर्गवारीत बदल करण्याचे अधिकार व इतर आनुषंगिक अधिकार प्रकल्प अधिकारी यांच्याकडे राहतील. याव्यतिरिक्त अधिकच्या अटी व शर्ती संस्थांवर बंधनकारक राहतील.

संस्थेची निवड अर्जाची ज्येष्ठता, निधीची उपलब्धता, प्राप्त लक्षांक व क्षेत्रानुसार निश्चित केलेल्या निकषांवर केली जाईल. संस्थेची निवड प्रकल्प अधिकारी कार्यालयामार्फत नियमाप्रमाणे होईल. निवड झालेल्या संस्थांनी विवाह सोहळ्याची तारीख आणि निमंत्रण पत्रिका विवाहाच्या १५ दिवस आधी कार्यालयात सादर करणे आवश्यक आहे.

## हत्तीरोग निर्मूलनासाठी 'ट्रिपल ड्रग थेरपी' मोहिमेला वेग : मुख्यमंत्री

**मुंबई**
सार्व मंथन । वृत्तसेवा

महाराष्ट्रासह देशभरात हत्तीरोग (लिम्फॅटिक फिलेरियासिस) निर्मूलनासाठी 'ट्रिपल ड्रग थेरपी' (आयडीए) अर्थात आयव्हरमेक्टिन, डीईसी (डायइथिलकार्बामाझीन) आणि अल्बेंडाझोल या औषधांच्या संयुक्त उपचाराला गती देण्यात येत आहे. केंद्र शासनाने २०२७ पर्यंत भारतातून हत्तीरोगाचे संपूर्ण उच्चाटन करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. या मोहिमेत राज्य शासनाने सक्रिय सहभाग घेतला असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, विशेषतः दुर्लक्षित असलेल्या हत्तीरोगासारख्या आजारांवर प्रभावी उपाययोजना करण्यासाठी केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाने सुरुवात केली. देशात २०१७ मध्ये सर्वात प्रथम महाराष्ट्र राज्यात विशेषतः विदर्भातील जिल्ह्यांना या औषधोपचारासाठी सर्वोच्च प्राधान्य देण्याची केंद्र सरकारकडे विनंती केली होती. यामुळे महाराष्ट्रातील, विशेषतः विदर्भातील आदिवासी व ग्रामीण भागातील लोकांचे दुःख मोठ्या प्रमाणात कमी होण्यास मदत होत आहे. तसेच, देशातून हत्तीरोग निर्मूलन करण्याच्या प्रधानमंत्री यांच्या स्वप्नपूर्तीतही मोठा वाटा उचलून या उपक्रमात महाराष्ट्र शासन पूर्ण सहकार्य देत आहे.

# जि.प. शाळेसाठी कलर प्रिंटर खरेदीसाठी देणगी

**सोनगाव**
सार्व मंथन । प्रतिनिधी

## मान्यवरांच्या हस्ते सुपूर्त



शिक्षणाच्या दर्जात भर घालण्यासाठी व विद्यार्थ्यांना आधुनिक सुविधांचा लाभ मिळावा या उद्देशाने कोल्हार भगवतीपूर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेसाठी कलर प्रिंटर खरेदीसाठी देणगी सुपूर्त करण्यात आली. या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

सौ. सुनीता व श्री. दत्तात्रय रंभाजी राऊत (सेवानिवृत्त तालुका कृषी अधिकारी व सामाजिक कार्यकर्ते) यांच्या पुढाकारातून शनिवार दिनांक २१ मार्च २०२६ रोजी हा उपक्रम राबविण्यात आला. मा. नामदार डॉ. राधाकृष्ण विखे पाटील (जलसंपदा मंत्री व पालकमंत्री, अहमदनगर जिल्हा) यांच्या शुभहस्ते रुपये ११,००० ची देणगी शाळेसाठी सुपूर्त करण्यात आली.

ही देणगी साहेबराव अनाप सर, मुख्याध्यापक, जि.प. प्राथमिक शाळा, कोल्हार भगवतीपूर यांच्याकडे देण्यात आली असून या निधीतून शाळेसाठी कलर प्रिंटर खरेदी करण्यात येणार आहे. या सुविधेमुळे विद्यार्थ्यांना प्रकल्प, नोंदी, शैक्षणिक साहित्य व विविध उपक्रमांसाठी दर्जेदार प्रिंटआउट उपलब्ध होणार आहेत.

या प्रसंगी आण्णासाहेब म्हस्के पाटील (माजी मंत्री व संचालक, अहमदनगर जिल्हा सहकारी बँक), दत्तात्रय कराळे (विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक परिक्षेत्र) तसेच सोमनाथ घार्गे (पोलीस अधीक्षक, अहमदनगर),सोमनाथ वाघचौरे अपर पोलीस अधीक्षक, श्रीरामपूर विभाग यांची प्रमुख उपस्थिती होती. उपस्थित मान्यवरांनी या उपक्रमाचे कौतुक करत शिक्षण क्षेत्रासाठी अशा सामाजिक उपक्रमांची गरज अधोरेखित केली.

शाळेच्या विकासासाठी स्थानिक पातळीवर होत असलेले असे सहकार्य निश्चितच प्रेरणादायी असून यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेत सकारात्मक बदल घडणार असल्याचा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

### हमी भावाखाली खरेदी केल्यास

# व्यापाऱ्यांवर 'थेट' कडक कारवाई

## सभापती पाटील; गहू-हरभऱ्याच्या दरात व्यापाऱ्यांची लूट!

**नेवासा**
सार्व मंथन । प्रतिनिधी

निसर्गाच्या लहरीपणाशी झुंज देत पिकवलेल्या शेतमालाची हमीभावाखाली खरेदी करून शेतकऱ्यांची लूट करणाऱ्या व्यापाऱ्यांची आता गय केली जाणार नाही. बाजार समितीत हमीभावापेक्षा कमी दराने खरेदी करणे हा कायद्याने गुन्हा असून, अशा व्यापाऱ्यांवर थेट कडक कारवाई करण्यात येईल, असा इशारा नेवासा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती नंदकुमार पाटील यांनी दिला आहे.



केंद्र सरकारने गव्हासाठी २,५८५ रुपये आणि हरभऱ्यासाठी ५,८७५ रुपये प्रति क्विंटल हमीभाव जाहीर केला आहे. मात्र, आवक वाढताच काही व्यापारी "मालाची प्रत खराब आहे" किंवा "आवक जास्त आहे" अशी कारणे पुढे करून गव्हाची खरेदी अवघ्या १,८०० ते २,२०० रुपयांनी करत असल्याचे समोर आले आहे. हरभऱ्याचे दरही पाडले जात असल्याच्या तक्रारी बाजार समितीकडे प्राप्त झाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर सभापतींनी व्यापाऱ्यांना कडक तंबी दिली आहे.

यावेळी पाटील म्हणाले, हमीभाव ठरवताना उत्पादन खर्चच चुकीच्या पद्धतीने धरला जातो. कृषी विद्यापीठे व राज्य सरकारने सुचविलेला खर्च आणि केंद्र सरकारचा हमीभाव यामध्ये मोठी तफावत आहे. उत्पादन खर्च कमी दाखवला जात असल्याने शेतकऱ्यांच्या हक्काचा दर मारला जात आहे. अशा स्थितीत व्यापाऱ्यांनी किमान हमीभावाने तरी खरेदी करणे आवश्यक आहे.

शेतकऱ्यांनीही आपला माल घाईघाईने कमी दरात विकू नये, असे आवाहन करण्यात आले आहे. एखादा व्यापारी हमीभावापेक्षा कमी बोली लावत असल्यास शेतकऱ्यांनी तात्काळ बाजार समिती प्रशासनाशी संपर्क साधावा. अशा व्यापाऱ्यांवर परवाना रद्द करण्यासह कठोर कारवाई करण्यात येईल, असेही स्पष्ट करण्यात आले.

## महिला व बालकांच्या पोषणात लक्षणीय सुधारणेचे उदिष्ट्य : मुख्यमंत्री

**मुंबई**
सार्व मंथन । वृत्तसेवा

राज्यातील कुपोषणाच्या समस्येवर मात करुन महिला व बालकांच्या आरोग्य आणि पोषणात लक्षणीय सुधारणा घडवून आणण्याच्या दिशेने महाराष्ट्राने महत्त्वपूर्ण पाऊल टाकले आहे. महिला व बाल विकास विभाग आणि चिल्ड्रन्स इन्व्हेस्टमेंट फंड फाऊंडेशन यांच्यात महिला व बालकांच्या पोषणा संदर्भात पाच वर्षांसाठी सामंजस्य करार करण्यात आला असून, या भागीदारीमुळे माता व बाल पोषण निर्देशांकात मोठी उंची गाठली जाईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे.

महिला व बाल विकास विभागाचे सचिव डॉ. अनुपकुमार यादव यांच्या उपस्थितीत हा करार झाला. यावेळी चिल्ड्रन्स इन्व्हेस्टमेंट फंड फाऊंडेशनच्या कार्यकारी संचालक मंजुला सिंग, डायरेक्टर स्ट्रॅटेजिक इनिशिएटिव्ह्ज अँड पार्टनरशिप्स अखिल पाळीअथ आणि अन्य वरिष्ठ प्रतिनिधी उपस्थित होते. या कराराअंतर्गत कुपोषणावर प्रभावी नियंत्रणासाठी विशेष भर देण्यात येणार आहे.

प्रधानमंत्री मातृ वंदना योजना सारख्या थेट लाभ हस्तांतरण योजनांचा लाभ अधिकाधिक पात्र महिलांपर्यंत पोहोचवून त्यांचा प्रभावी वापर सुनिश्चित केला जाणार आहे. सुरुवातीच्या टप्प्यात पालघर, जालना, नंदुरबार, गडचिरोली आणि अमरावती या जिल्ह्यांमध्ये यासंदर्भातील अंमलबजावणी करण्यात येणार असून, राज्यस्तरावरही तांत्रिक साहाय्य दिले जाणार आहे.

# नगर अर्बन बँक घोटाळा : आरोपींच्या मालमत्ता जप्तीचा निर्णय

**अहिल्यानगर**
सार्व मंथन । प्रतिनिधी

## ठेवीदारांना न्याय मिळण्याचा मार्ग मोकळा



नगर अर्बन बँक घोटाळ्यातील आरोपी चेअरमन, संचालक, वरिष्ठ अधिकारी तसेच काही मोठ्या कर्जदारांच्या मालमत्ता जप्त करण्याचा महाराष्ट्र शासनाचा निर्णय हा ठेवीदारांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा व दिशादर्शक ठरला आहे. या निर्णयामुळे बँक बुडवणाऱ्या जबाबदार घटकांवर ठोस कारवाईची प्रक्रिया वेगाने सुरू झाली आहे.

नगर अर्बन बँकेतील चेअरमन, संचालक व वरिष्ठ अधिकाऱ्यांनी संगनमताने भ्रष्ट कारभार करत बँकेचे अस्तित्व धोक्यात आणले. ठेवीदारांचा निधी धोक्यात घालून मोठ्या प्रमाणावर आर्थिक गैरव्यवहार करण्यात आले. शासन व रिझर्व बँकेकडून वेळोवेळी सूचना देऊनही सुधारणा न करता भ्रष्टाचार सुरूच ठेवण्यात आला. विशेषत: २०१४ नंतर मल्टीस्टेटच्या नावाखाली कायद्याचा गैरफायदा घेत भ्रष्टाचारात मोठी वाढ झाली.

या सर्व प्रकाराचा परिणाम म्हणून २०२३ मध्ये बँकेचा परवाना रद्द झाला आणि ठेवीदारांचे कोट्यवधी रुपये अडकले. सुमारे ११४ वर्षांची परंपरा असलेल्या बँकेचा जवळपास १७५ कोटी रुपयांचा निधी धोक्यात आला. २०१७ पासून सभासदांना लाभांश मिळणे बंद झाले, तर अनेक कर्मचाऱ्यांवर बेरोजगारीची वेळ आली.

दरम्यान, बँक बचाव समितीने या प्रकरणाचा सातत्याने पाठपुरावा करत मोठ्या प्रमाणावर वसुली केली. आतापर्यंत ठेवीदारांना सुमारे ७० टक्के रक्कम परत मिळाली आहे. उर्वरित ३० टक्क्यांपैकी १५ टक्के रक्कम एप्रिल २०२४ मध्ये देण्याची प्रक्रिया सुरू असून उर्वरित १५ टक्क्यांसाठीही लढा सुरू राहणार असल्याचे समितीने स्पष्ट केले आहे. देशभरात ठेवीदारांना एवढ्या मोठ्या प्रमाणात रक्कम परत मिळवून देण्याचे हे एकमेव उदाहरण मानले जात आहे.

याच पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाने १८ मार्च २०२४ रोजी अधिसूचना काढून संबंधित आरोपी, संचालक, अधिकारी व काही कर्जदारांच्या मालमत्ता जप्त करण्याचे आदेश दिले आहेत. जप्त करण्यात येणाऱ्या मालमत्तांची एकूण किंमत कोट्यवधी रुपयांपेक्षा अधिक असल्याचा अंदाज आहे. या कारवाईतून ठेवीदारांचे पैसे, व्याज, बँकेचा निधी, सभासदांचा लाभांश तसेच कर्मचाऱ्यांचे भविष्य सुरक्षित करण्याचा प्रयत्न होणार आहे.

तसेच, संबंधित आरोपींकडून मालमत्ता विक्री करून सर्वसामान्यांची फसवणूक होऊ नये, यासाठी शासनाने नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. अधिसूचनेत संबंधित मालमत्तांची सविस्तर यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे.

दरम्यान, बँक बचाव समितीच्या प्रयत्नांमुळे ठेवीदारांना न्याय मिळत असून, ११४ वर्षांची परंपरा असलेली नगर अर्बन बँक पुन्हा सुरू करण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याची माहिती पत्रकार परिषदेत राजेंद्र गांधी, राजेंद्र चोपडा, अॅड. अच्युत पिंगळे व डी. एम. कुलकर्णी यांनी दिली.

यामधील आरोपी सुरेश शिवराम सातपुते, केशव भाऊसाहेब काळे, विनोदकुमार अण्णासाहेब श्रीखंडे, अनिल चंदुलाल कोठारी, महादेव पंढरीनाथ साळवे, अजय अमृतलाल बोरा, रवींद्र विठ्ठल कडूस, सतीश विठ्ठल रोकडे, मनेष दशरथ साठे, गिरीश केदारनाथ लाहोटी, राजेंद्र केशवराव डोळे, नवनीत शांतीलाल सुपरिया, प्रगती देवेंद्र गांधी, सरोज दिलीप गांधी, शैलेश सुरेश मुनोत, दिनेश पोपटलाल कटारिया, अक्षय राजेंद्र लुनावत, केदार मुरलीधर लोहाटी, शिवदास दिलीप गायकवाड, शितल शिवदास गायकवाड, सचिन दिलीप गायकवाड, दीप्ती सुरेंद्र गांधी, देवेंद्र दिलीप गांधी, सुरेंद्र दिलीप गांधी, संदीप ईश्वरदार वाघमारे, रवींद्र विठ्ठल जेजुरकर, अशोकलाल माधवलाल कटारिया, राजेंद्र बहिरू म्हस्के, आशुतोष सतीश लांडगे या व्यक्तींची कुणीही कोणत्याही जमिनीचा व पैशाचा व्यवहार करू नये कारण जमिनी हे महाराष्ट्र शासनाकडून जप्त करण्यात येणार असल्याने व्यवहार करू नये असे बँक बचाओ समितीने सांगितले.




सायं. दैनिक
# सार्वमंथन
नवी दिशा, नवी आशा






## मंथन फटकारे

**अनुसंगम तथा बाळासाहेब शिंदे**
**मो. ९५०३९५९९५७**

आम्हांला कोणीच हरवू शकत नाही, या भ्रमात भाजपने राहू नये–शरद पोंक्षे

**– घरचा आहेर? की जनतेला वेडयात काढण्याचा नविन प्रयोग?**

राहुरी शहरात दोन गटात तुंबळ हाणामारी–वृत्त

**– कायद्याचा धाक...? विटंबणा प्रकरणातील आरोपी? खंडोबा यात्रा मिटिंग गोंधळ? दररोज काही ना काही... राहुरी पोलिसांचे काम...?**

खरातसोबत(कॅप्टन भोंदूबाबा)फोटो काढणे गुन्हा नाही–छगन भुजबळ

**–फोटो, व्हिडीओ काढण्यास काय? हरकत काहीच नाही, पण पाय धुणे, छत्री धरणे... असे फोटो, व्हिडीओ नको ना?**

खरातची वळवळ दडपण्यासाठी झिरवळची हिरवळ बाहेर आली की काय?–वृत्त

**– अजितदादाचा अपघात झाल्यानंतर 'घड्याळवाले' जास्त अडचणीत आलेले दिसतात? यादी वाढतच चाललीय?**

नगर अर्बन बँक घोटाळ्यातील आरोपिंची मालमत्ता जप्त होणार–वृत्त

**– गोर–गरिबांचा पैसा खाणाऱ्यांना अद्दल झालीच पाहिजे! राहुरीतील जिजाऊ पटसंस्थेत ठेव ठेवणाऱ्यांचा पैसा कधी मिळणार? काहींचा तर मृत्यू झालाय!**

कॅप्टन भोंदू खरातशी नीलम गोऱ्हेची भेट–तृप्ती देसाई

**– असे म्हणतात की 'स्त्रीची वैरी स्त्रीच असते' त्याचा प्रत्यय भोंदू प्रकरणात जास्त येत आहे! बऱ्याच 'पुढारी स्त्रिया' एकमेकींना टार्गेट करत आहेत?**

## अवकाळीने झालेल्या
# नुकसानीचे पंचनामा करा



### पालकमंत्री विखे पाटील यांच्या अधिकाऱ्यांना सूचना

**शिर्डी**
**सार्व मंथन । प्रतिनिधी**

अवकाळी पावसाने शेती पीकांचे तसेच नागरीकांच्या अन्य नूकसानीचे वस्तूनिष्ठ पंचनामे महसूल व कृषी विभागाने तातडीने सुरू करावे. नूकसानग्रस्तांना स्थायी आदेशाप्रमाणे मदत उपलब्ध करून देण्याच्या सूचना जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी जिल्हा प्रशासनाला दिल्या आहेत. शेतकऱ्यांच्या पाठीशी महायुती सरकार भक्कमपणे उभे असल्याची ग्वाही त्यांनी दिली.

जिल्ह्यात मागील आठवड्यात तसेच २६ ते ३१ मार्च २०२६ दरम्यान अवकाळी पावसाने मोठ्या प्रमाणात नूकसान झाले. यासंदर्भात पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडून जाणून घेतली. जिल्ह्यात १९ मार्च २०२६ रोजी अवकाळी पावसाने झालेल्या नूकसानीचा प्राथमिक अहवाल प्राप्त झाला असून, सर्वच तालुक्यातील शेतीपीकांना नूकसान पोहचले आहे.

१०३ गावे बाधीत झाले असून, कमी अधिक प्रमाणात एकूण १२ हजार ९९९ शेतकऱ्यांचे ८ हजार हेक्टर क्षेत्राचे नूकसान झाले आहे. प्रामुख्याने कांदा, मका, टरबूज, हरभरा, भाजीपाला, गहू, बाजरी, डाळींब इत्यादी पिकांना धोका पोहचला असल्याचे मंत्री विखे पाटील यांनी सांगितले.

वादळी वारे तसेच पावसाने घरांचे पत्रे उडून जाणे, घरांच्या पडझडीच्या घटना, जनावारांच्या गोठ्यांच्या नूकसानीची तालुका निहाय माहिती संकलित करण्याचे काम सुरू झाले आहे. अंतिम आकडेवारी समोर आल्यानंतर मदतीचे प्रस्ताव तयार करून बाधीत नागरीकांना शासन मदत देण्याची कार्यवाही होईल.

मंत्री विखे पाटील की, जिल्ह्यात सोमवारी सांयकाळी झालेल्या पावसाने लोणी खुर्द येथील सोमनाथ जिजाबा गाडगे या ३७ वर्षीय शेतकऱ्याचा आणि पाथर्डी तालुक्यातील मालेवाडी येथील शिवाजी रघूनाथ खेडकर यांचा वीज पडून मृत्यू झाल्याची दुर्देवी घटना घडली आहे. राहाता तालुक्यातील पाथरे बुद्रूक येथे संजय भास्कर घोलप यांच्या गोठ्यावर वादळी वाऱ्याने वीज वाहक तार पडून १० गायींचा मृत्यू झाला आहे. यासर्व घटनांचा पंचनामा करण्यासाठी महसूल तसेच पशुसंवर्धन विभागाला सूचना देण्यात आल्या आहेत.

# माझं गाव, आरोग्य संपन्न गाव' अभियानाला प्रारंभ

**मुंबई**
**सार्व मंथन । वृत्तसेवा**

महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाचा चेहरामोहरा बदलण्यासाठी आणि ग्रामीण जनतेला दर्जेदार आरोग्य सुविधा त्यांच्या उंबरठ्यावर उपलब्ध करून देण्यासाठी राज्य सरकारने 'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' हे अत्यंत महत्त्वाकांक्षी अभियान सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर आणि राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांच्या पुढाकाराने राबविण्यात येणाऱ्या या राज्यव्यापी अभियानाला १ एप्रिलपासून प्रारंभ होत आहे.

हे अभियान फक्त सरकारी कार्यक्रमापुरते मर्यादित न राहता, लोकसहभागाद्वे त्यातून एक व्यापक आरोग्य चळवळ उभी राहावी, असा राज्य शासनाचा मानस आहे. या अभियानांतर्गत प्रत्येक गाव आरोग्यसंपन्न केले जाणार आहे. या प्रस्तावित योजनेमुळे गावापासून ते राज्यस्तरावरील आरोग्य सेवांचे आणि यंत्रणांचे सक्षमीकरण होण्यास मदत होणार आहे. तसेच या उपक्रमामुळे तळागाळातील लोकांपर्यंत वैद्यकीय सेवा पोहोचणार आहेत.

# चोरट्यांकडून शेळ्या–बोकड चोरी

### कंपाऊंडची जाळी कापून मध्यरात्रीची घटना; पोलिसांत गुन्हा दाखल

**पाथर्डी**
**सार्व मंथन । प्रतिनिधी**

तालुक्यातील त्रिभुवनवाडी येथे अज्ञात चोरट्यांनी शेळ्या व बोकड चोरी केल्याची घटना घडली असून या प्रकरणी पाथर्डी पोलीस ठाण्यात सोमवारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, त्रिभुवनवाडी येथील शेतकरी आजिनाथ रामभाऊ कारखेले (वय ६०) हे आपल्या पत्नीसमवेत शेती व्यवसाय करून उदरनिर्वाह करतात. त्यांच्या मालकीच्या सहा शेळ्या असून त्या घराशेजारी पत्र्याच्या शेडमध्ये जाळीच्या कंपाऊंडमध्ये ठेवण्यात आल्या होत्या.

दि. २४ मार्च २०२६ रोजी रात्री सुमारे ११ वाजण्याच्या सुमारास कारखेले यांनी नेहमीप्रमाणे शेळ्यांना चारा टाकून त्या सुरक्षित ठिकाणी असल्याची खात्री करून झोप घेतली. मात्र, दुसऱ्या दिवशी दि. २५ मार्च रोजी सकाळी ६ वाजता ते चारा टाकण्यासाठी गेले असता शेडमधील शेळ्या गायब असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले.

यावेळी त्यांनी परिसराची पाहणी केली असता कंपाऊंडची जाळी कापलेली आढळून आली. अज्ञात चोरट्यांनी याच मार्गाने आत प्रवेश करून तीन काळ्या रंगाच्या बीट्टल जातीच्या शेळ्या व दोन बोकडे (एक तांबडा व एक काळा) असा एकूण सुमारे ४५ हजार रुपये किमतीचा माल चोरी केल्याचे उघड झाले.या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. या प्रकरणी अज्ञात चोरट्यांविरुद्ध पाथर्डी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## तुटलेली तार गोठ्यावर पडून ०९ गायांचा मृत्यू

सार्व मंथन राहाता । पाथरे बुद्रुक येथे विजेच्या तारेचा धक्का (करंट) लागून ९ गायींचा मृत्यू होऊन शेतकऱ्यांचे जवळपास ८–९ लाखांचे नुकसान झाले आहे. पाथरे बुद्रुक गावात काल सोमवार दि.३० मार्च रोजी रात्री ९ वाजण्याच्या सुमारास ही दुर्दैवी घटना घडली. विजेची तुटलेली तार थेट गोठ्यावर पडल्याने संजय भास्कर घोलप व सोपान लक्ष्मण घोलप यांच्या ९ गायींचा जागीच मृत्यू झाला. या घटनेमुळे शेतकऱ्यांचे अंदाजे ८ ते ९ लाख रुपयांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

## अहिल्यानगरमध्ये रिपाईला नवी धार!
# निसार पठाण यांची जिल्हा उपाध्यक्षपदी वर्णी

### जिल्ह्यासह राहुरीत अभिनंदनाचा वर्षाव

**राहुरी**
**सार्व मंथन । तालुका प्रतिनिधी**

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडीया (अ) मध्ये संघटनात्मक पातळीवर मोठी हालचाल पाहायला मिळत असून पक्ष अधिक आक्रमक पवित्रा घेण्याच्या तयारीत आहे. याच पार्श्वभूमीवर निसार हसन पठाण यांची अहिल्यानगर जिल्हा उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. ही नियुक्ती पक्षाच्या उत्तर नगर जिल्हाध्यक्ष सुरेंद्र थोरात यांच्या हस्ते करत जाहीर करण्यात आले.

केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री तथा रिपब्लिकन पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष रामदास आठवले यांच्या नेतृत्वाखाली पक्ष राज्यात नव्या जोमाने विस्तार करत असून, स्थानिक पातळीवरही संघटन मजबूत करण्यावर भर दिला जात आहे. त्याचाच भाग म्हणून पठाण यांच्यावर ही महत्त्वाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.



पक्षाकडून जारी करण्यात आलेल्या नियुक्तीपत्रात पठाण यांच्या सामाजिक व राजकीय कार्याची दखल घेत त्यांच्या निष्ठेला मान्यता देत ही निवड करण्यात आल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे उत्तर जिल्ह्यात पक्षाला नवी ऊर्जा मिळणार असून, आगामी राजकीय समीकरणात रिपाई अधिक आक्रमक आणि निर्णायक भूमिका बजावणार असल्याचे संकेत मिळत आहेत.

दरम्यान, निसार पठाण यांनी नियुक्तीनंतर पक्ष संघटना गावपातळीपर्यंत मजबूत करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. पक्षाच्या ध्येय–धोरणांचा झपाट्याने प्रसार करून सामान्य कार्यकर्त्याला न्याय मिळवून देणे, हीच प्राथमिकता असेल, असे त्यांनी ठामपणे सांगितले.

राजकीय वर्तुळात या नियुक्तीकडे मोठ्या उत्सुकतेने पाहिले जात असून, आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर रिपाईची ही चाल किती प्रभावी ठरते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



# 'जलजीवन'च्या तलावात तिघे अल्पवयीन बुडाले

### नातेवाईकांचा टाहो, सर्वत्र शोककळा, तिन्हीही युवक सापडले

**घोडेगाव**
**सार्व मंथन । प्रतिनिधी**

नेवासा तालुक्यातील घोडेगाव येथील जलजीवन प्राधिकरणाच्या गेल्या काही वर्षांपासून संथ गतीने साठवण तलावाचे काम चालू असलेल्या साठवण तलावामध्ये तिघांचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडलेली आहे. यामध्ये रिहान अन्वर शेख हा सुदैवाने बचावला आहे. रिहान शेख (वय १०) याने बुडाल्याची माहिती गावात दिली.

या दरम्यान दोघांचा मृतदेह पाण्याबाहेर काढण्यास यश आले असून नऊ वाजेपर्यंत एका मृतदेहाचा शोध चालू होता, तोही मृतदेह आज सापडला आहे.

मृत्यू झालेल्या युवकांची नावे अशी, प्रथमेश सुभाष काळे (वय १७), जीवन रवींद्र आव्हाड (वय १७), शोयोब आयुब शेख (वय १६, राहणार घोडेगाव) या तिघांचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची घटना घडल्याने घोडेगाव गावावर व परिसरात प्रचंड शोककळा पसरलेली आहे.

सदर तलावामध्ये जलजीवन प्राधिकरणाचे काम काही वर्षांपासून चालू असून एक महिन्यापूर्वी हा साठवण तलाव कोरडा ठाक असताना काम संथ गतीने सुरू होते. त्यानंतर मुळा उजव्या कालव्याला पाणी सोडल्याने त्याचा पर्क्युलेशन पाण्याचा पाझर या तलावामध्ये जमा झाला आणि या पाण्यामध्ये ही घटना घडल्याची चर्चा परिसरात होत आहे.

यावेळी नागरिकांनी, नातेवाईकांनी व बघ्यानी मोठी गर्दी केलेली होती, यावेळी वाहतूक ठप्प झाली होती. सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. घटनास्थळी राज्याचे आपत्ती पथक सी. आर. भांगरे, सपोनि अनिल मोरे, फौजदार सुरज मेढे, मदतनीस सह अधिकाऱ्यांनी पाहणी करून पुढील कार्यवाही सुरू केले आहे. जीवन प्राधिकरण साठवण तलावाच्या बाजूने कोणतेही, सुरक्षा सुविधा नसल्याने तेथील सुरक्षा व्यवस्था रामभरोसे आहे.

## कर्जत, श्रीरामपूर उपजिल्हा रुग्णालयात वैश्विक
# दिव्यांग प्रमाणपत्र प्रणाली कार्यान्वित

**अहिल्यानगर**
**सार्व मंथन । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील कर्जत तसेच श्रीरामपूर येथील उपजिल्हा रुग्णालयांमध्ये नवीन वैश्विक दिव्यांग प्रमाणपत्र वितरण प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे. यामुळे जिल्ह्यातील अस्थिव्यंग तसेच नेत्र दिव्यांगत्व असलेल्या नागरिकांची मोठी गैरसोय टळणार असून प्रमाणपत्र मिळवण्यासाठी त्यांचा होणारा प्रवास व वेळ वाचणार आहे, अशी माहिती जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय घोगरे यांनी दिली आहे.

पुणे येथील दिव्यांग कल्याण आयुक्तालयाकडून या प्रणालीसाठी आवश्यक युजर आयडी व पासवर्ड उपलब्ध करून देण्यात आला आहे. सदर रुग्णालयांमध्ये दिव्यांग बोर्डातील तज्ज्ञ डॉक्टरांमार्फत रुग्णांची तपासणी करून त्यांना प्रमाणपत्रे वितरित केली जातील.

प्रशासनाने रुग्णांच्या सोयीसाठी तालुकानिहाय दिवस निश्चित केले असून श्रीगोंदा, जामखेड व कर्जत तालुक्यातील रुग्णांची वैद्यकीय तपासणी उपजिल्हा रुग्णालय कर्जत येथे महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारी करण्यात येईल. तसेच अकोले, संगमनेर, कोपरगाव, राहाता व श्रीरामपूर येथील रुग्णांसाठी उपजिल्हा रुग्णालय श्रीरामपूर येथे महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या बुधवारी दिव्यांग तपासणी व प्रमाणपत्र वितरण शिबिराचे आयोजन करण्यात येणार आहे.

या नव्या सुविधेमुळे दिव्यांग बांधवांची होणारी हेळसांड थांबण्यास मदत होणार असून संबंधित तालुक्यातील सर्व दिव्यांग बांधवांनी आपल्या जवळच्या आरोग्य संस्थेत उपस्थित राहून या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहनही श्री.घोगरे यांनी केले आहे.

# हनुमंतगाव येथे हरिनाम सप्ताहास भक्तिमय वातावरणात प्रारंभ

**सोनगाव**
**सार्व मंथन । प्रतिनिधी**

राहाता तालुक्यातील हनुमंतगाव येथे रामनवमी ते हनुमान जयंतीनिमित्त ब्रम्हलीन सदगुरू नारायणगिरी महाराज व मणिकगिरी महाराज यांच्या कृपाशीर्वादाने ग्रामदैवत हनुमंतराय यांचा अखंड हरिनाम सप्ताहास प्रारंभ झाला आहे.

सात दिवस अखंड हरिनामाचा जयघोष होणार असल्याने परिसरात भक्तीमय वातावरण आहे.सप्ताहनिमीत्त मंदिरात आकर्षक सजावट व विद्युत रोषणाई करण्यात आली आहे.या सप्ताहामध्ये महाराष्ट्रातील नामांकीत किर्तनकारांचा कीर्तन महोत्सव आयोजित केला आहे. या सप्ताहनिमित्त पहाटे काकडा, ग्रंथराज ज्ञानेश्वरीचे पारायण,संत तुकाराम गाथा भजन,सायंकाळी ५ वाजता हरिपाठ, अखंड विना वादन, कीर्तन असे अनेक धार्मिक कार्यक्रम आयोजित केले आहे.




गुरुवार दि २६ रोजी सकाळी १० वाजता ह.भ.प.दत्तगिरीजी महाराज उंबरेश्वर, वंरवडी देवस्थान यांचे हस्ते ध्वजारोहण पार पडले. रोज सायंकाळी आठ ते दहा या वेळेत कीर्तन महोत्सव होणार आहे.

या कीर्तन महोत्सवामध्ये मुक्ताताई महाराज दिघे, अनिताताई जाधव,ज्योतीताई महाराज पवार, श्रीगणेश महाराज वाघमारे, उत्तम महाराज गाढे, रोहीणीताई राऊत ,बाबानंद वीर महाराज यांचे कीर्तन होईल. ३ एप्रिल रोजी सकाळी दहा वाजता ह.भ.प.भागवत महाराज सातभाये संस्थापक अध्यक्ष जगदंबा वारकरी शिक्षण संस्था आळंदी देवाची यांचे काल्याचे कीर्तन होणार आहे. त्यांना ज्ञानराज माऊली सेवा भावी संस्था आश्वी खुर्द येथील वारकरी संस्थेतील मुले, गायनाचार्य, बाल मृदुगांचार्य व हनुमान भजनी मंडळ, संत सावता महाराज भजनी मंडळ यांची साथ असेल. गुरुवार दि २ रोजी सायंकाळी ४ वाजता ज्ञानेश्वरी ग्रंथ पारायणाची भव्य मिरवणूक त्यानंतर ह.भ.प.वीर बाबानंद महाराज व लोणी पोलीस स्टेशनचे पी.एस. आय यांच्या हस्ते दिपवंदनाचा कार्यक्रम होईल.

हा सप्ताह पंचक्रोशीत प्रसिद्ध असून अनेक दानशूर भाविक तसेच अन्नदाते यांचे सप्ताहामध्ये मोठे योगदान देत असतात. दररोज सायंकाळी अनेक महाप्रसादाच्या पंगतीचे आयोजन केले आहे.शुक्रवार दि ३ रोजी काल्याचे कीर्तन झाल्यावर महाप्रसादाचे वाटप होईल. या कीर्तन महोत्सवास परीसरातील भाविकांनी उपस्थित राहून कीर्तन श्रवणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन सप्ताह आयोजन कमिटी, हनुमान भजनी मंडळ,संत सावता भजनी मंडळ,स्वामी समर्थ ग्रुप, युवा मंच, ज्ञानदिप वाचनालय,सावता महाराज मित्रमंडळ व ग्रामस्थांच्यावतीने करण्यात आले आहे.

सायं. दैनिक सार्वमंथन नवी दिशा, नवी आशा

हे पत्रक मुद्रक, मालक, प्रकाशक **अनिल गंगाधर कोळसे** यांनी यांच्या **स्वराज प्रेस अँण्ड प्रिटींग** येथे ५९३, राहुरी बु।, ता. राहुरी, जि. अहमदनगर (महा) येथे छापून कोळसे दुबीचा मळा, व्यंकोबा मंदीर परिसर, राहुरी, ता. राहुरी, जि. अहमदनगर ४१३ ७०५, (महा.) येथे प्रकाशित केले. संपादक अनिल गंगाधर कोळसे सदर अंकात प्रकाशित झालेल्या लेख बातम्यांच्या मजकूराशी संपादक सहमत असेलच असे नाही. न्यायालयीन वाद–विवाद राहुरी न्याय कक्षेअंतर्गत (खाजगी वितरणासाठी) मुद्रणीय दोष संभवणीय.
RNI No. MAHMAR/2016/72596